# रियाल दिनार

मज्जा आणि रक्त हयांच्या घोटीव मिश्रणाला
सोनेरी स्वप्नांची झिलई दिल्यावर
दिनारांच्या धातू तयार होते

वादळांच्या प्रचंड झोताने
रसरसून पेटते वाळवंटाची अजस्त्र भट्टी
धातू एकजीव होतो

तारवटलेल्या पेशींच्या मुशीतून
सापळ्यांच्या साच्यात
दिनार ओतला जातो

सगळं थंडावताना
[illegible] दिनार तयार होतो

REFBK-0022870
REFBK-0022870


निरंजन उजगरे

२४९६
२२८७०
आवि

REFBK-0022870

REFBK-0022870

दिनार



निरंजन उजगरे

'दिनार'च्या प्रकाशनासाठी श्री. शरद दांडेकर, चेअरमन, कॅम्लिन प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई आणि व्ही. जी. वझे चॅरिटी ट्रस्ट, मुंबई यांजकडून आर्थिक सहाय्य मिळाले. मनःपूर्वक आभार!

प्रथमावृत्ती :
१४ डिसेंबर १९७९

© १९७९ निरंजन उजगरे

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
मुंबई ४०० ००४

प्रकाशक :
हरिश्चंद्र भास्कर उजगरे
'उषा-चंद्र', १७/सी, मिनिलँड
भांडुप (पश्चिम), मुंबई ४०० ०७८

मुखपृष्ठ :
श्री अरुण ठाकूर

वितरक :
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

किंमत : सात रुपये

जन्मभूमीपासून शेकडो मैल लांब असलेल्या
वाळवंटास कर्मभूमी बनवून राहणाऱ्या माझ्या
भारतीय बांधवांस, तसेच 'दिनार' घडवताना
सातत्याने जिच्या प्रेमळ पाठिंब्याचा
लाभ झाला त्या माझ्या प्रिय पत्नीस–सौ. अनुपमेस
सप्रेम अर्पण...

‘दिनार’ हा एका व्यक्तीचा अनुभव नाही.
त्याला कथावस्तूही नाही.

आखातातील अरब देशात नोकरीसाठी
गेलेल्या हजारो भारतीयांच्या आयुष्याची,
भावविश्वाची मला जाणवलेली आणि मी
अनुभवलेली स्पंदने म्हणजे ‘दिनार’.

आखाती देशांतील माझ्या प्रवेशास आणि वास्तव्यास सहाय्यभूत
झालेले माननीय नामदार श्री. सदानंद वर्दे आणि
दुबईमधील माझे मित्र नंदू गोखले, सौ. जयश्री गोखले,
सतीश नायक, सॅमसन भिटे, श्री. चंदवानी
ह्यांचा ऋणनिर्देश केल्याशिवाय ‘दिनार’ची
घडण अपूर्ण राहील.

श्री. पु. भागवतांनी ‘मौज वितरण’तर्फे
‘दिनार’ला चलनात आणण्याचे मान्य केले
हे मी माझे भाग्य समजतो.

निरंजन उजगरे

*भूतकाळातल्या धडपडणाऱ्या रस्त्यांचा*
*एक निर्णायक रन-वे झाला*
*आणि........*

# २ दिनार

विमानाच्या खिडकीमधून
मला दिसले अनेक हात,
माझ्यासाठीच एकत्र फडफडताना
आशीर्वाद देशाचा!

काही क्षणांतच मी तरंगत होतो
आर्तभोर समुद्रावरून
सोनेरी दिशेकडे......

# दिनार ३

ढगांच्या विरलेल्या जमिनीतून
अखंड जाणवणाऱ्या पाण्याला
कधी मिळणार आहे किनारा ?
वैराण किनाऱ्यावर फुलण्याइतपत
माझी स्वप्नं तग धरतील का ?
की पुन्हा अखंड शोध किनाऱ्याचा ?

अस्थिर बोटांत
सोनेरी मद्य हिंदकळत आहे...

# ४ दिनार

सोनेरी वाळूतळ्यात उमललेला
शुभ्र कमळांचा गच्च थवा—
माझ्या स्वप्नभूमीचं पहिलं दर्शन.

# दिनार ५

करपलेल्या वाळुकारण्यात झेप घेतो
ॲल्युमिनियमचा विशाल पक्षी.

झडझडतात आणखी पिसे,
तिरंग्याचे अनेक ठिपके.
दमट हवेत सैरभैर झाले...

# ६ दिनार

इथे माझ्या देशातले लोक
चंदेरी पक्ष्यावर स्वार होऊन
मैलांचे शेकडो ढग ओलांडून येतात;
वर्तमानाचे पंख काळ्या दाट तेलात बुडवून
भविष्य कमावतात.

इथे तिरंग्याच्या चक्रात
मिसळलेला असतो चांद
आणि ताऱ्याचा मंद प्रकाश
झिरपत असतो शुभ्र पट्ट्यात—
केशरी पहाट उगवण्याची
हीच वेळ असते.

भारत-पाक सीमेवर
म्हणे लढाई चाललीय्...

## ८ दिनार

पायघोळ पुरुषी झग्याला लगटून चाललेली
भारतीय मादी पाहिली
आणि दचकलोच!

अरे ही तर—हिच्याच लग्नात
मीसुद्धा दोन अक्षता टाकल्या होत्या.
नंतर एकदा ऐकलं होतं,
'खूप पैसा पाठवते नवऱ्याला...'

मुकादमाने आईवरून दिलेल्या
गलिच्छ शिव्यांनी
सेल्हीन अधिकच होरपळतो.
वेल्डिंग-रॉड निमूटपणे पुढे सरकतो...

वंडीपेरियार टेकडीवर
चहाची पत्ती खुडता-खुडता
उताराला लागलेली अम्मा
वाट पाहत असते
ड्राफ्टची सेल्हीनच्या......

# १० दिनार

सतत अठ्ठेचाळीस तास
ओव्हरटाईम केल्यानंतर,
माझी पांढरी एअरकंडीशण्ड गाडी
माझं शरीर
घरापर्यंत आणून सोडते.

प्रसन्न संध्याकाळ मरीना–बीचवरची
मनसोक्त पीत हुंदडणारी
एके काळची माझी स्कूटर
माझ्या स्वप्नात येते...

## दिनार ११

दोन दिवसांपूर्वी
वाळूचं प्रचंड वादळ येऊन गेलं.
प्रोजेक्ट-लँडचा
पुन्हा सर्व्हे घेण्यासाठी
आम्ही बाहेर पडलो.

वाळूच्या पृष्ठभागावर
एकमेकांत जखडलेले दोन सांगाडे दिसले—
एक उंटाचा आणि एक माणसाचा.

दोन दिवसांपूर्वी वावरणारे
कितीजण नाहीसे झाले ?
कधी मिळणार त्यांचे सांगाडे ?
की कधीच नाही ?
माझ्या पायांखाली कोण आहे ?

# १२ दिनार

अशोकचं स्वप्नच वेगळं आहे.
इथल्या वाळूच्या भक्कम पायऱ्या
पश्चिमेकडे वळवायच्या आहेत;
दिनारांच्या पायावरती
डॉलर्सचा इमला चढवायचा आहे;
ओॲसिसच्या आधाराने
पुष्करिणी फुलवायची आहे...

## दिनार १३

इथल्या वाळूने ध्यास घेतला आहे,
उंच-उंच इमारती प्रसवण्याचा,
सुपरमार्केट्स जोजवण्याचा;
शरीरावरील लांब-रुंद रस्त्यांवरती,
आलिशान मोटारी खेळवण्याचा;
स्तनांतून झरणाऱ्या तेलावरती,
प्रगतीची बाळं पोसण्याचा...

# १४ दिनार

असंख्य बिलोरी निऑन-साईन्सनी
झुंबरलेल्या स्कायलाइनखाली
मिरवतेय् चकचकीत बाजारपेठ जगाची.

आलिशान शो-रूम्स स्ट्रीमलाईन्ड गाड्यांच्या,
खच्चून भरलेली दुकानं कपड्यांची,
सोन्याच्या बिस्किटांची, सोलर घड्याळांची;
प्रदर्शनं झुलताय्‌त इलेक्ट्रॉनिक युगाची,
रंगीत टी. व्हीं. ची, व्हिडिओ टेप्सची,
पोलोरॉईड कॅमेऱ्यांची;
झुंबड उडालीय् लज्जीझ खाद्य-पेयांची.

परफ्यूम्सनी फवारली
गर्दीनं गर्भारली,
मिरवतेय् चकचकीत बाजारपेठ जगाची......

## दिनार १५

असेही काही अरब असतात.
कचकचणाऱ्या मोहल्यात राहतात,
खुबूस खाऊन दिवस काढतात,
हुंड्याच्या उलट्या प्रथेने खचून
हैद्राबाद, कराची, मिरजेला जातात—
स्वस्तामध्ये लग्नं उरकतात,
सुखी होतात.

असेही काही अरब असतात.

# १६ दिनार

माधवानीची आहे साधीच नोकरी,
एका दुकानात भागीदारी.

आई, बायको, दोन-चार बहिणी
आळीपाळीने येऊन जातात,
बॅगा तुडुंब भरून घेतात,
सांताक्रूझला फोन लावून,
बांधलेल्या कस्टम्सचा ‘ओ. के.’ मिळताच,
दुबईला विमानात शिरतात.
‘इंपोर्टेड’ वस्तूंचा ‘सेल’ करून
इंडियात हजारो रुपये मिळतात...

माधवानीची आहे साधीच नोकरी.

# दिनार १७

होरपळलेली वर्षे कधीच विसरलो.
स्वप्नांनीही पाहिली नसतील,
अशा स्वप्नांची वातानुकुलीत पूर्ती
माझ्या आयुष्याला आज सामोरी...

# १८ दिनार

सलारजंग म्युझियममधली
झिरझिरीत संगमरवरामागची
संगमरवरी रिबेका
जवळून गेल्याचा भास झाला—

रात्री चोरून गेलो ब्लू-फिल्मला—
रिबेका—ओह् रिबेका !

दूरस्थ काफिल्याच्या आठवणीने जडावल्या
खजुरीच्या ओलसर झावळ्या,
परक्या वाळूवर खिन्न उमटल्या
एकाकी पावलांच्या जड खुणा...

## २० दिनार

दोन वर्षांपूर्वी,
कोरलेल्या भुवया उंचावत
तू नाकारलंस!
लखलखीत इयररिंग्स
डोळे चरचरत गेल्या.

नंतर एका इंटरव्ह्यूने
इथल्या देशात आणून सोडले.

आज वधूसाठी जाहिरात दिली.
उत्तरांच्या ढिगाऱ्यातून
तुझं उत्तर दिसलं आणि
मन गच्च मिटत गेलं…

# दिनार २१

दोन वर्षे तुटल्यानंतर
प्रथमच भारतात आलो तेव्हा
स्वागताने दडपून गेलो
जेवणं, पार्ट्या, मौज–मजा—

नंतर जाणवलं कुठेतरी बिनसलंय्
भेटवस्तूंच्या समप्रमाणात
आपुलकीचं नातं बदललंय.
काही जुळलंय्, काही टिकलंय्, काही तुटलंय्
मन माझं कुरतडत चाललंय्...

# २२ दिनार

गेटवेजवळच्या हॉटेलमधून
उतरणारा अरब पाहून
छाती सताड उघडी करून
ती पोराला पाजू लागली—
'सलामआलेकुम् रफिक' म्हणत
अरबाला जवळ बोलावू लागली.

खिश्यातला खुर्दा वाडग्यात पडला.
पोराच्या गालांवरून,
आईच्या स्तनांवरून,
अमीर हात फिरू लागला—

मुंबईवर सावट पसरणारी
एक नागडी संध्याकाळ
माझे कपडे ओरबाडत पुढे गेली...

## दिनार २३

म्हाताऱ्या आजीच्या केसांसारखा
मुलायम जीर्ण पांढरा ढग
पश्चिमेकडे तरंगत आहे.
घरून निघताना आजीकडे
भरभरून पाहिलं होतं.

आता हा ढग
हळू-हळू नाहीसा होतोय्—
आजीची हीच शेवटची भेट...

# २४ दिनार

झेलमची झाली मिरजेला शादी.
लवकरच्च पालखी दर्यापार गेली.

बाजारी आयुष्यात झेलमला घेरी,
नाहीसे झाले वाळूवर पाणी...

## दिनार २५

माझ्याशेजारून चालत असते
प्राजक्तपाकळी केरळीय नर्स.

अचानक पाठून
परफ्यूमचा उग्र घमघमाट येतो.
मी ऐकतो,
'सौ रूपया देगा–चलती क्या?'

कारण नसूनही
जवळच्याच दुकानाकडे माझं पाऊल वळतं...

## २६ दिनार

इथे पोलीसला 'शुर्ता' म्हणतात.
शुर्त्यांच्या पावलानं दुकानं थरारतात
हजारोंच्या नोटा हातात ठेऊन
लोक निश्चिंत शॉपिंग करतात.

इथे मित्राला 'रफिक' म्हणतात.
रफिकसाठी अरब जीव टाकतात
अरबाचा रफिक होण्यासाठी
रफिकार्थी शर्थ करतात...

# दिनार २७

मित्राबरोबर भारतात पाठवलेल्या
बंद पाकिटातील निरोप :

'मधुचंद्राचे रंगीत फोटो
तुला सोबत पाठवीत आहे,
वर्षभर जडव चित्रांवर डोळे...'

'आणि हो ! बातमी समजली—
तुला इकडे यायचे तर,
खरंच आपल्याला परवडणार नाही.
कर व्यवस्था क्युरेटिंगची...'

# २८ दिनार

परवरदिगार अरबाबसाठी,
त्याच्या गोऱ्या फोरमनसाठी,
सहकाऱ्यांच्या दोस्तीसाठी,
इथे बरंच करावं लागतं—

गोऱ्या-गोमट्या कोवळ्या मुलांचं
ओव्हरटाईमशिवायही चालू शकतं...

# दिनार २९

पाच वर्षांपूर्वी,
वडिलोपार्जित ठिकऱ्या उडालेल्या
जमिनीची माझी ठिकरी
आणि फोफावत गेलेल्या
दारिद्र्याची गुंतावळ मागे ठेवून
मी इथे आलो.

आज माझ्या ठिकरीवर उभा
माझा टुमदार बंगला.
लवकरच उगवतील अनेक ठिकऱ्यांवर
अनेक बंगले
आणि विकतच्या बासमतीचे,
दरवळतील वारे...

## ३० दिनार

कालच्या ‘ इंडियन एक्सप्रेस ’मध्ये,
‘ पहिल्या चोरीच्या आरोपाखाली,
दिल्लीत एकास दंडावर सोडले...’

आजच्या ‘ गल्फ न्यूज ’मध्ये,
‘ चोरीसाठी सुताराचे हात तोडले,
स्वदेशी पाठवले...’

# दिनार ३१

रस्त्यांवरून वाहणाऱ्या
वाळूच्या लाटांमधून,
संध्याकाळची बांग पसरत जाते.

आम्हा उतारूंना रस्त्यावर सोडून
मशिदीच्या दिशेने
टॅक्सी सुसाट वाहू लागते...

# ३२ दिनार

गुरुवारी रात्री,
मित्रांच्या भेटी,
स्टिरिओवर मुलायम
'बरसात'ची गाणी;
पत्त्यांच्या डावाला मद्याची जोडी,
पहाटे स्वप्नात बदामची राणी...

# दिनार ३३

जुम्मादिनी संध्याकाळी,
उंची परफ्यूम्स अंगावर फवारून
भटकायला निघालो.

खूप गवत पाहून मन तरारलं
नंतर कळलं ते,
हिरवा गालिचा पसरलेलं,
फुटबॉलचं स्टेडियम होतं—

मुकाट मनानं परतत होतो,
अचानक टपटपणाऱ्या
पावसानं खुळावलो
मृद्गंध शाकारून,
मनामध्येच
गावाला पळालो...

## ३४ दिनार

आठवडाभरच्या शॉपिंगनंतर
अन्वर पॅकिंग करतो आहे,
भरलेल्या बॅग्स पुन्हा–पुन्हा
वीस किलोत बसवतो आहे...

ज्यादा किलोस चाळीस रुपये,
एअर-पोर्टवर दारू विकत घेणे
स्टिरिओ, कॅमेरा घेतले तर,
कस्टम्समध्ये नाही खरे...

तलम साड्या, गरम कपडे,
केशर, खजूर, बदाम–पिस्ते,
ब्लेड्स, सिगरेट्स, लिपस्टिक्स, स्प्रे,
मोठ्या यादीत अन्वर बुडे...

बॅग्सच्या कोपऱ्या–कोपऱ्यातून
आप्तांच्या अपेक्षा डोकावत आहेत,
दोन वर्षांची चक्की पिसून,
अन्वर स्वदेशी जात आहे···

माझ्या वर्गातला हुशार बाबू,
विमानात भेटला सुटात बाबू,
व्हिस्कीची मजा लुटता-लुटता
एअर होस्टेसशी झटणारा बाबू,
शेखचा दोस्त बनलेला बाबू,
स्मगलिंगचा दादा झालेला बाबू,
गॉगल्सच्याआड दडलेला बाबू,
कस्टम्सवाल्यांना पोसणारा बाबू...

पुस्तकात एकदा भेटला होता,
स्वदेशीच्या घोषणा करता-करता,
ट्रकटायरखाली फुटलेला बाबू—

तो पण बाबू, हा पण बाबू...

## ३६ दिनार

विमानतळावर जाण्याआधी
तू विचारतेस–
'परत कधी भेटणार रे–?'

माझ्या डोळ्यांसमोर अचानक पसरतो
दोन वर्षांचा अथांग समुद्र
आणि
क्षितिजावर उभी असलेली तू...

काळी आई विकून बसला,
एजंटला पैसे देऊन फसला,
दोन महिन्यांच्या कामानंतर,
सावत्र देशात बेकार झाला—

किसानपुत्र जमीन कसणारा
अन्न कमावतो उचलून कचरा.
कसं लिहिणार घरच्यांना ?
परतीसाठी नाही पैसा.
किनाऱ्यावर गच्च रूतलेल्या
जीर्ण लाकडी पिंपावर
ओमप्रकाश बसलेला
आजूबाजूस दाटल्यात कथा,
बेवारशी शंख–शिंपल्यांच्या.

क्षितिजावर नाहीशी
होत आहे टुमदार नौका...

## ३८ दिनार

मन आणि रक्त ह्यांच्या घोटीव मिश्रणाला
सोनेरी स्वप्नांची झिलई दिल्यावर
दिनारांचा धातू तयार होतो.

वादळांच्या प्रचंड झोताने
रसरसून पेटते वाळवंटाची अजस्र भट्टी—
धातू एकजीव होतो.

तारवटलेल्या पेशींच्या मुशीतून
सापळ्यांच्या साच्यात,
दिनार ओतला जातो.

सगळं थंडावताना,
लख्ख दिनार तयार होतो...

# दिनार ३९

आम्ही सातजण एकाच खोलीचे.

खाटांमध्ये चालण्याचे अंतर आहे.
एक-दोघे रेडिओ किंचाळत आहेत,
एक-दोघे पत्रं लिहीत आहेत,
एक-दोघे रमीत बुडाले आहेत,
गरमागरम वाचनालयं
आपल्या गाद्या बदलत आहेत,
लंगोट, लुंग्या, पगड्या, गंज्या
अस्ताव्यस्त लटकत आहेत,
सातजणांचा घाम वाळवीत
दोन पंखे भरभरत आहेत.
जड डोळ्यांच्या, ठणकत्या मेंदूंच्या
मोबदल्यात अकौंट्स फुलत आहेत.

आम्ही सातजण एकाच खोलीचे...

रहायला घरे पोटभर खाणे,
(संप-लढ्यास बंदी इथे
खाजगी जीवन सुरक्षित आहे.
(जाहीर सभांना बंदी इथे)
(प्रकाशनांस बंदी इथे)
शेखला सलाम करीत-करीत,
इथले नागरिक खुशीत सारे…

संगमरवरी मशीद चांदण्यात न्हाली,
हातमोज्यांना आठवली,
बोटांची जाळी,
ताजमहालच्या पुढ्यात
बुजलेली—मिटलेली.

तुला लिहायच्या ओळींनी
माझ्या मनात नक्षी केली...

उरोज डेरेदार करण्यासाठी
चोपडण्याच्या खास ट्यूब्सना
इथे फार मागणी आहे.

हेच कारण असेल,
खजूराहोची शिल्पं इथे
ठिकठिकाणी आढळण्याचे...

माटुंग्याचा परवेझ खुशीत आहे.
खुर्शीदला साड्या, मुलांना गाड्या
अधून-मधून पाठवतो आहे,
फटफटीवर फटाकड्यांना
फिरवतो आहे, बदलतो आहे.

खुर्शीदसुद्धा खुशीत आहे.
'इंटिमेट'चा सुवास
माटुंग्याच्या बागेत
मित्रांच्या टोळक्यात
दरवळतो आहे...

ह्या अनोळखी वेशातल्या देशात
माझ्या हृदयातला तू
मला अधिकच जाणवू लागलायस.
सकाळचे काही क्षण
तुझ्या स्वाधीन करूनच
हल्ली माझा दिवस
घराबाहेर पडू लागलाय्.

कालची तर चोवीस डिसेंबरची रात्र !

घरापासून दूर वाळूवर
काही पेट्रोमॅक्सच्या मेणबत्त्या
कॅरल्सच्या लयीत झुलू लागल्या...
चांदणगच्च आभाळाखालची
वाळू तुडवीत थंड शिर्शिरी,
मी अनवाणीच पळत सुटलो,
गाणाऱ्या घोळक्यात सामील झालो—

'Glory to the King of Kings—'

माझ्या हृदयातला तू,
मला अंधुक दिसू लागलास...

मला आठवतो
घनभोर मेघ घरावर दाटून येणारा
आणि धुवांधार पाऊस आसमंत शाकारणारा.

इथे भेटतो
धुराचा ढग रिफायनरीतून धुमसणारा
आणि शॉवरबाथ, खारट पाणी फवारणारा...

## ४६ दिनार

मेसमध्ये आज फीस्टची पाळी
माझ्यापुढे आहे भारतीय थाळी.

सिलोनी फोडणीत लेबनीज भाजी,
न्युझिलंडी बासुंदीत स्पॅनिश केशरकांडी,
पाकिस्तानी पुलाव अन् अमेरिकन पुरी,
जॉर्डनियन बटाट्याची खमंग भजी,
ऑस्ट्रेलियन मटनाची मसालेदार करी,
इंग्लंडहून आलेली मिठाची पुडी,
भारतात मुरलेली चटकदार लोणची,
अफगाण बदाम-पिस्त्यांनी जडवलेली बर्फी—

माझ्यापुढे आहे भारतीय थाळी...

गुन्हे करताना पकडले गेलेले,
स्वदेशी परतण्याचा आदेश मिळालेले,
पोलिसांच्या कोंडाळ्यातले,
माझे नतमस्तक देशबांधव पाहिले—

मनात दिमाखाने भरून येणाऱ्या
गाण्याच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडाल्या,
'होटोंपे सचाई रहती है,
यहाँ दिलमें सफाई रहती है,
हम उस देशके वासी हैं...'

वाळूत असेही महाल आहेत.

स्विमिंग–पूलच्या नितळ जळात,
संगमरवरी राजहंस आहेत;
शयनगृहात ज्यांच्या निळसर
मखमली फिरते पलंग आहेत,
रंगीत टी. व्ही., ड्रिंक बार्स,
सिस्टिम्स स्टिरिओ, दुर्मिळ क्युरिओ,
प्रत्येक खोलीत पेरले आहेत;
वॉल टु वॉल कारपेट्सवरून
कोमल तळव्यांच्या अनेक जोड्या
मस्तीमध्ये वावरत आहेत—

वाळूत असेही महाल आहेत...

## दिनार ४९

इंडिया क्लबमधली
पार्टी पंधरा ऑगस्टची
एकदम ग्रँड झाली.

फॅन्सी ड्रेस, नाच-गाणी,
किणकिणणाऱ्या नव्या भेटी,
डौलदार लचक चमचमसाडी...

बऱ्याच रात्री घरी आलो
देशभक्तीने भारलेली
कॅसेट टेप चालू करून,
नेहमीची व्हिस्की काठोकाठ भरून,
म्युझिकल लायटरने 'डनहिल' पेटवून,
ब्रह्मचारी खोलीत ताणून पसरलो...

'प्यारी जन्मभूमी,
मेरी प्यारी जन्मभूमी...'

# ५० दिनार

इथल्या वे-साईड गॅरेजमध्ये
तेलकट कपड्यांत दिवसभर घामेजणारा
मोटारींखालचे नट्स आवळणारा
माझा दोस्त,
घरी सुट्टीवर जातो तेव्हा,
भपक्या कपड्यांवर परफ्यूम ओतून,
नातेवाईकांना भेटी देत
टॅक्सीमधून नेहमी फिरतो.

इंडियामध्ये तो,
ऑटोमोबाईल इंजिनियर असतो...

इंडियात जाण्यापूर्वी
आम्ही आधुनिक गुलाम
'सेल'च्या पाट्या हुडकत
बाजारात हिंडू लागतो.

वीस रुपयांची साडी,
इंडियात 'नॉट लेस दॅन हंड्रेड.'
डिस्पोझेबल गॅस लायटर्स
पंचवीस रुपयांत डझनभर—रस्त्यावर
आणि अशा कितीतरी किफायतशीर वस्तू.

थोड्याच किमतीत आम्हा गुलामांना
इंडियात अनेक गुलाम करता येतात...

# ५२ दिनार

भल्या पहाटे मी उतरतो
गजबजलेल्या एअरपोर्टवर.
दिसतात कस्टम्सच्या काचांमागे,
नातेवाईकांचे उत्सुक चेहरे.
तू सुद्धा उभी असतेस,
मी न पाहिलेलं
आपलं दीड वर्षांचं बाळ
कडेवर घेऊन,
जीव भरून मला पाहत.

बाहेर पडल्यावर,
थरारलेली तू बाळालाच म्हणतेस,
'हे बघ तुझे बाबा आलेत.'

माझाच चेहरा पण—
परकी नजर!

लँडिंगनंतर बसलेला पहिला धक्का...

ह्या घड्याळाची किंमत मोजायची तर,
एकांतात पोळलेले क्षण मोजावे लागतील.
आई वारल्याचा टेलेक्स वाचून
सुन्न मनाचे कढ मोजावे लागतील.
पाण्याने गळणारे केस मोजावे लागतील,
आंबलेल्या सांध्यांतले ठणके मोजावे लागतील,
करपलेल्या कातडीवरच्या सुरकुत्या मोजाव्या लागतील,
तळव्यांवरील भेगांचे गुंते सोडवावे लागतील,
कोणकोणत्या गोष्टी मोजाव्या लागतील,
ह्याची कोडी जन्मभर सोडवावी लागतील...

ह्या घड्याळाची किंमत मोजायची तर—

## ५४ दिनार

कामावर रुजू होण्याचा व्हिसा
संपत आला तेव्हा,
तुझे भरभरून येणारे डोळे
आणि आपलं खूप आजारी बाळ
डोळ्यांत साठवीत मी निघून आलो.

दोन दिवसांतच तुझा टेलेक्स आला,
'सगळं संपलं—'

मी भयाण एकटा.
हे रखरखीत वाळवंट
माझ्या अश्रूंनी
जरासुद्धा ओलावणार नाही...

# दिनार ५५

आज माधव आणणार असतो
तिने बनवलेल्या करंज्यांचा डबा
आणि बडबडीच्या टेप्स माझ्या मुलीच्या.

नंतर समजतं,
सगळंच मिळालं समुद्राला...

किती जमवलं माधवनं वर्षात एका?
आजपासून ओव्हरटाईम वाढवायला हवा!

छोटीसाठी घेतलेले परीचे फ्रॉक्स
शो–केसमधील बाहुल्यांवर
कल्पनेनेच चढवले,
इंडियात जाणाऱ्या मित्राकडे पाठवले.

छोटीला परत पाहीन तेव्हा,
फ्रॉक्स लहान झालेले असतील...

आमच्यातलेच काही
गरीब कोवळया मुली
लांडग्यांना विकतात,
हातभट्टीची दारू
एकांतात गाळतात,
सुपरमार्केट्समध्ये
उचलेगिरी करतात,
भिकाऱ्यांहून लाचार होऊन
अरबांना पिडतात,
टुमदार बंगल्यांच्या
भिंती भिजवतात,
दिनारांची थुंकी
रुपयांवर झेलतात.

आमच्यातलेच काही!

माझ्यापुढचा अरब
चिकनटिक्का खातो.

'हॅऽ मलबारी' म्हणून
कबाबावर भुणभुणणाऱ्या
माशीला हाकलतो—

कटु सत्याने कान भाजतो,
माझा वास बशीतच राहतो...

मुलगा इंजिनियर व्हावा म्हणून
आयुष्यातली दहा वर्षे तोडून
वाळवंटात पांढरी भिंत बांधणारा
तिप्पट पगार कमावणारा
सुरकुतलेला गवंडी पाहिला,
ऑफिसबॉय म्हणून आलेला
फर्स्टक्लास केमिस्ट पाहिला,
मेलनर्सच्या जागेवरती
ग्रॅज्युएट डॉक्टर पाहिला,
कांटवरचा ग्रंथ वाचणारा
मेहसाणी आचारी पाहिला,
चोरून दुबईत शिरता-शिरता
पोलिस–लॉंच दिसताक्षणी
पडावातून ढकलला गेलेला
तट्ट फुगलेला भारतीय पाहिला...

मुलांच्या शाळा—ओव्हरटाईम,
आईबाबांचे आजार—ओव्हरटाईम,
शहरात घ्यायचंय् घर—ओव्हरटाईम,
बहिणींची लग्नं—ओव्हरटाईम,
नोकरी जायची भीती—ओव्हरटाईम,
भारतात गेल्यावरची चिंता—ओव्हरटाईम,
करमणुकीचा एकच टाईम—ओव्हरटाईम—

ओव्हरटाईमच्या दमट सापळ्यात
इथे येणारा लवकरच जखडतो
थोड्याच काळात गंजण्याचा शाप
इथल्या वस्तूंना जन्मतःच मिळतो...

मुलांना भारतातच ठेवायला हवं.

जागतिक बाजारपेठेमध्ये
त्यांचं बालपण विकायला नको,
पैशांचं जाड कातडं त्यांच्या
नजरेवरती चढायला नको,
हाणामारीच्या कार्टून्समध्ये
'शुभं करोती' हरवायला नको.

मुलांना भारतातच ठेवायला हवं...

# ६२ दिनार

माझ्या हिचं
मागच्या महिन्यात पत्र आलं
जाईची फुलं ठेवलेलं,
बब्ड्यानं रेघोट्या मारलेलं...

काल पुन्हा पत्र आलं.
बब्ड्याचा ताप चढत जातो.
'बाबा-बाबा' गुंगीत कण्हतो—

पुढील अक्षरांचे थेंब
मला वाचवत नाहीत...

REFBK-0022870
REFBK-0022870

हे विझत चाललेलं आभाळ पाहिलं आणि
एके काळचं माझं गाजलेलं पेंटिंग आठवलं,
एके काळचं माझ्या कवितेतलं
छायागर्भ मळभ आठवलं.

तुटलेल्या रंगांचं, ओळींचं नातं
वस्‌कन् अंगावर धावून आलं···

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९६
अ. क्र. २२८७०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

हा सूर्य की वाळू ?
की सूर्याची वाळू ?
की वाळूचा सूर्य ?
की सूर्यच सूर्य ?

हा उंट की पाणी ?
की उंटाचं पाणी ?
की पाण्याचा उंट ?
की उंटच उंट ?

ही राख की माणूस ?
की राखेचा माणूस ?
की माणसाची राख ?
की राखच राख ?